# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड          डि.सी.आर.          दिनांक   १३/०८/२०१८**

## प्रेस नोट

### स्थानिक गुन्हे शाखेने पोलीस ठाणे रामानंद नगर जिल्हा जळगांव येथील खुनाच्या गुन्हयातील एक वर्षापसुन फरार अरोपीस केले जेरबंद

.....................................................................................................

मा. पोलीस अधीक्षक श्री संजय जाधव साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक नांदेड श्री डॉ. अक्षय शिंदे साहेब, यांचे आदेशान्वये फरारी व पाहिजे आरोपी शोधकामी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नांदेड श्री राज्रेंद सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली पथकाची स्थापना करण्यात आली होती.

पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड श्री राजेंद्र सहाणे यांचे पथकातील सपोनि श्री विनोद दिघोरे, पोउपनि श्री सदानंद बाबुराव वाघमारे, पोउपनि श्री कल्याण नेहरकर व त्यांचे सोबतचे कर्मचारी यांनी पोलीस ठाणे रामानंद नगर जिल्हा जळगांव ९७/२०१७ कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९, ५०६ भा.दं.वि. सह कलम ३७ (१) महाराष्ट्र पोलीस कायद्या मधील खुनाच्या गुन्ह्यातील एक वर्षापासुन फरार असलेल्या आरोपीस नांदेड येथील गोकुळ नगर येथील रमा माता अंबेडकर पाटी जवळुन ताब्यात घेवुन त्याचे कडुन एक धार धार घातक शस्त्र तलवार जप्त करुन सदर आरोपीस पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील तपास कामी पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड श्री राजेंद्र सहाणे यांचे पथकातील पोउपनि सदानंद बाबुराव वाघमारे, पोउपनि कल्याण नेहरकर, सपोउपनि जसवंतसिंह शाहु, पोहेकॉ जांभळीकर, पोह दत्ता वाणी, पोना पांगरीकर, पोशि बालाजी सातपुते, पोशि तानाजी येळगे, पोशि जावेद, पोशि मनोजसिंह परदेशी, पोशि घुगंरुसिग टाक यांनी केली आहे.

पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड